आरबीआय/ २००८-०९/५०७
डीबीओडी. क्र. डीएल. बीसी. १३८/२०.१६.०४२/२००८-०९ जून २४, २००९

१) सर्व अनुसूचित वाणिज्य बँका (आरआरबी व एलएबी सोडून)
२) अधिसूचित अखिल भारतीय वित्तसंस्था

महोदय,

**स्वतःचा कर्ज-अहवाल मिळविता येणे**

कृपया आमचे परिपत्रक डीबीओडी. क्र. डीएल. ११५९०/२०.१६.०३४/२००७-०८ दि. फेब्रुवारी २७,२००८ चा संदर्भ घ्यावा. त्यात बँकांना/वित्तसंस्थांना सांगण्यात आले होते की, त्यांनी क्रेडीट इन्फर्मेशन कंपनीज (रेग्युलेशन) अधिनियम, २००५ च्या संदर्भात डेटा बेस तयार करण्यासाठी लगेच पाउले उचलावीत आणि वेळ न गमाविता कर्ज विषयक माहितीची अदलाबदल करण्यास तयार व्हावे.

२) अलिकडे, रिझर्व बँकेकडे, माहितीचा हक्क अधिनियम, २००५ खालीही अनेक तक्रारी येत आहेत की ग्राहकांना त्यांच्या बँकेकडून त्यांच्या कर्जाबाबतचे अहवाल मिळत नाहीत.

३) ह्या संबंधाने आम्ही आपले लक्ष, क्रेडीट इन्फर्मेशन कंपनीज (रेग्युलेशन) अधिनियम, २००५ च्या कलम २१ च्या उपकलम (१) मधील तरतुदींकडे वेधू इच्छितो. त्यानुसार, "कोणत्याही कर्ज संस्थेपासून कर्ज सुविधा मिळविण्यासाठी अर्ज करणारी कोणतीही व्यक्ती, त्या संस्थेने, क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीकडून किळालेल्या माहितीच्या प्रत त्याला मिळावी ह्यासाठी त्या कर्ज संस्थेला विनंती करु शकते," ह्याशिवाय, ह्या कलमच्या उपकलम (२) मध्येही विहित केले आहे की, उपकलम (१) मध्ये दिल्याप्रमाणे अशी विनंती मिळाल्यावर, प्रत्येक कर्ज संस्था, रिझर्व बँकेने विनियमांखाली विहित केलेले शुल्क भरल्यावर, त्या व्यक्तीला, कर्ज विषयक माहितीची एक प्रत देईल

४) आपणास माहितीच असेल की, ह्या अधिनियमाखाली तयार झालेल्या क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीज रेग्युलेशन्स, २००६ मधील विनियम १२ (३) मध्ये, रिझर्व बँकेने ह्या कामासाठी कमाल शुल्क रु ५०/- (रुपये पन्नास) विहित केले आहे.

५) ह्यासाठी बँका आणि वित्तसंस्था ह्यांना सांगण्यात येते की, त्यांनी क्रेडिट इन्फर्मेशन कंपनीज (रेग्युलेशन) अधिनियम, २००५ च्या तरतुदींचे आणि त्याखाली तयार केलेले नियम व विनियम ह्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

कृपया पोच द्यावी.

आपला,

(विनय बैजल)
मुख्य महाव्यवस्थापक